ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख १३ एप्रिल, १९५५ | अंक १५

## विविध माहिती

**नेपाळला भारताची मदत**—नेपाळमध्यें तांदुळाची टंचाई पडल्यामुळें भारतीय सरकारनें नेपाळ सरकारला १०,००० टन तांदूळ देणगी म्हणून देण्याचें ठरविलें आहे. दुष्काळग्रस्तांना मदत म्हणून पंतप्रधान नेहरूहि मदत फंडामधून ५०,००० रुपये पाठविणार आहेत. नेपाळच्या तराई भागांत उद्भवलेल्या कॉलऱ्यावर व देवीवर उपाय करण्यासाठी वैद्यकीय मदतहि धाडण्यांत येत आहे.

**मद्रास राज्यांतील कापडाचें उत्पादन**—गेल्या वर्षी मद्रास राज्यांतील कापडाच्या गिरण्यांनीं ५,७६,००० गांसड्या सूत आणि ८७,००० गांसड्या कापड ह्यांचें उत्पादन केलें असा अंदाज करण्यांत आला आहे. मद्रास राज्यांत सुमारें ८० कापडाच्या व सुताच्या गिरण्या आहेत व त्या सर्वांत मिळून २० लाखांवर चात्या आणि ८,४०० माग आहेत. कापडाच्या धंद्यावर उपजीविका अवलंबून असणाऱ्यांची संख्या अंदाजें एक लाख आहे.

**राजस्थानांतलि प्राच्यविद्या-संशोधन**— राजस्थानांतील सांस्कृतिक महत्त्वाच्या ऐतिहासिक ग्रंथांचें संशोधन करण्यासाठी एक प्राच्य-विद्या-संशोधन-संस्था स्थापन करण्यांत आली आहे. संस्थेच्या पायाचा दगड जोधपूर येथें राष्ट्राध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद ह्यांनीं बसविला. भारतामधील माजी संस्थानिकांनीं अशा प्रकारचे हजारों ग्रंथ पूर्वी जमविलेले आहेत.

**सौराष्ट्रांतील नगरपालिकांना मदत**—सौराष्ट्रांतील नगरपालिकांना आपल्या हद्दींत सार्वजनिक उद्यानें तयार करण्यासाठी मदत म्हणून राज्य-सरकारनें ५ लाख रुपये मंजूर केले आहेत. ६० नगरपालिकांनीं ह्या कामासाठीं सरकारची मदत घेतली असून त्यांना आतांपर्यंत ४ लाख रुपये देण्यांत आले आहेत.

**संस्कृत कॉलिजला देणगी**—रायपूर येथें काढण्यांत यावयाच्या संस्कृत कॉलेजला महंत वैष्णवदास ह्यांनीं मोठी देणगी दिली आहे. देणगीमध्यें एक सर्व खेडें, एक सिनेमागृह आणि ७५,००० रुपये रोख इतक्यांचा समावेश आहे. सर्व मालमत्तेची मिळून किंमत सुमारें ३,००,००० रुपये होईल असा अंदाज आहे. स्थावर मालमत्तेसंबंधींचीं कागदपत्रें मध्यप्रदेशाच्या मुख्य मंत्र्यांच्या हवालीं नुकतीच करण्यांत करण्यांत आलीं.

**युगोस्लाव्हिआची भारताला मदत**—भारतांत यांत्रिक हत्यारें तयार करण्याचा एक कारखाना काढण्यासाठी युगोस्लाव्हिआच्या सरकारनें मदत देण्याची तयारी दाखविली आहे. युगोस्लाव्हिआ सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यानें ह्यासंबंधीं भारतीय सरकारच्या व्यापारी खात्यांच्या अधिकाऱ्यांशी नुकतीच चर्चा केली.

**आसाममध्यें साखरेचा कारखाना**—आसाम राज्यांत सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा एक साखरेचा कारखाना काढण्यांत येणार असून त्या कामीं राज्य-सरकारहि सहभागी होणार आहे. गोलाघाट विभागांतील ऊंस पिकविणारा प्रदेश कारखान्यासाठीं निवडण्यांत आला आहे. सुरवातीला ह्या कारखान्यांत दररोज ६०० टन ऊंस गाळला जाईल.

**धरणीकंपाला दाद न देणाऱ्या खोल्या**—क्वेट्टा येथील प्रत्येक घरांत धरणीकंपाला दाद न देणाऱ्या खोल्या बांधण्याची व्यवस्था पाकिस्तानचें सरकार करणार आहे असें समजतें. धरणीकंपांत उत्पन्न होणाऱ्या लोकांची सोय करण्यासाठीं ही योजना तयार करण्यांत आली असून ती पूर्ण करण्यासाठी सुमारें ४० लाख रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**अलवारजवळ नवें इस्पितळ**—अलवारपासून ३० मैलांवरील एका खेड्यांत नवें इस्पितळ बांधण्यांत आलें आहे. हें इस्पितळ शेठ नखनलाल नांवाच्या दानशूर धनिकानें आपल्या आजोबांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बांधलें आहे. इस्पितळासाठी ७ लाख रुपये खर्च आला असून त्यांत सर्व प्रकारचीं आधुनिक वैद्यकीय साधनें उपयोगासाठीं ठेवण्यांत आलीं आहेत.

**कॅनडाची भारताला देणगी**—कॅनडांतील युनिटेरिअन सर्व्हिस कमिटी ह्या संस्थेतर्फे इंडिअन को-ऑपरेटिव्ह युनिअन ह्या संस्थेला फिरता दवाखाना असलेली एक मोटार देण्यांत आली आहे. कॅनडामधील दाती संस्था ह्या मोटारीचा एक वर्षाचा खर्चहि सोसणार आहे. मोटार विकत घेण्यासाठीं लागलेला पैसा कोणा धनिकाकडून घेतलेला नसून, सामान्य लोकांनी वर्गणी करून जमविलेला आहे.

**निरोप नेण्यासाठीं कबुतरांचा उपयोग**—ओरिसा राज्यांतील बऱ्याच विस्तृत भागांत अद्याप तारायंत्राची सोय झालेली नाहीं. त्यामुळें अंतर्गत भागांतील घडामोडी कळणें अवघड होतें. ही अडचण दूर करण्यासाठी राज्याच्या पोलिस खात्यानें ९२८ कबुतरें पाळून त्यांचा उपयोग बातमी पोचविण्यासाठीं चालविला आहे. हीं कबुतरें राज्याच्या जिल्ह्यांतून वांटण्यांत आलीं आहेत. ओरिसा सरकारला ह्या “पोस्टा” साठीं दरवर्षी सुमारें ११,००० रुपये खर्च येतो.

**रशिअन सरकारचें नवें खातें**—रशिअन सरकारनें ‘जनरल मशिन बिल्डिंग’ ह्या नांवानें एक खातें सुरू केलें आहे. रशिआचे माजी मुख्य प्रधान मि. मॅलेन्कॉव्ह पदच्युत झाल्यावर नव्यानें अधिकारावर आलेल्या सरकारनें रशिआंतील भारी उद्योगधंद्यांच्या वाढीवर अधिक जोर देण्याचें धोरण जाहीर केलें होतें.

## दि सांगली बँक लि., सांगली

### ठेवी एक कोटीपर्यंत गेल्या

सांगली बँक लि. चा १९५४ अखेरचा ताळेबंद आमचेकडे आला आहे, त्यावरून बँकेचा व्यवहार समाधानकारक चालू असल्याचें दिसून येते. अहवालाच्या ह्या ३८ व्या वर्षांत बँकेस १,१९,६२२ रु. निव्वळ नफा झाला, त्यांतून २७,००० रु. जनरल रिझर्व्ह, ४५,००० रु. इन्कमटॅक्स तरतूद, ५,००० रु. बोनस, अशी वांटणी करून भागीदारांना १०% टॅक्स फ्री डिव्हिडंड वांटण्याचें ठरलें. १९५४ अखेर बँकेचें वसूल भांडवल ४,५०,००० रु. असून रिझर्व्ह व इतर फंडांत ५,४८,५५२ रु. आहेत. ठेवींची रक्कम सुमारें १ कोटी रुपये आहे आणि एकूण खेळतें भांडवल सुमारें १½ कोटि रुपये आहे. बँकेनें २०½ लक्ष रुपये रोख व बँकांत ठेवले आहेत व तिचेजवळ ३४ लक्ष रुपयांचे रोखे आहेत. अॅडव्हान्सेस ५७½ लक्ष रुपयांचे आहेत. १९५४ अखेरच्या नफा-वांटणीमुळें रिझर्व्ह व इतर फंड ह्यांची रक्कम ५,७५,००० रुपयांवर गेली आहे. बँकेच्या आजपर्यंतच्या इतिहासांत ठेवींच्या रकमेनें एक कोटी रुपयांची मजल गाठलेली नव्हती. १९५४ मध्यें बँकेनें तें यश मिळविलें आहे. १९५३ च्या मानानें ठेवींत १० लाखांची व १९५० च्या मानानें २५ लाखांची वाढ झालेली आहे. ठेवींच्या सुमारें ५०% रक्कम बँकेनें रोख, बँकांत व रोख्यांत अशी तरती बाळगलेली आहे. बँक लवकरच कोल्हापूर येथें शाखा सुरू करणार आहे, त्याबाबत पूर्व तयारी झालेली आहे.

### चेअरमनचें भाषण

बँकेचे चेअरमन, श्री. आर. व्ही. देशमुख, बी. ए., बी. लिट्. ( ऑक्स. ), कलेक्टर, दक्षिण सातारा, सांगली, ह्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत बँकेच्या प्रगतीचा उत्कृष्ट आढावा घेतला व बँकेच्या भक्कमपणाकडे बोर्डाचें कसें लक्ष आहे, हें त्यांनीं स्पष्ट केलें. मालाच्या किंमती एकसारख्या खालीं जात आहेत, त्यामुळें हंगामांतील पैशाची मागणी कमी झाली आहे, ह्याचा त्यांनीं उल्लेख केला. गोरवाला कमिटीच्या शिफारशींकडे लक्ष देऊन, सांगली बँकेनें आपलें धोरण आतांच बदलावें, ह्या सूचनेस त्यांनीं विरोध दर्शविला व बँकिंगच्या सर्वमान्य तत्त्वांप्रमाणेंच बँक चालविली जाईल, असें स्पष्टपणें सांगितलें. तुटीच्या अर्थव्यवस्थेमुळें चलनविस्तार भरमसाट होईल, ही भीति नष्ट झाली आहे व आपल्या व्यापारी-कारखानदारांनीं भवितव्याबद्दल साशंकता बाळगण्याचें कारण नाहीं, असा त्यांनीं समारोप केला.

### बँकेच्या प्रगतीचा आढावा

| | (आंकडे हजार रुपयांचे) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | १९५० | १९५१ | १९५२ | १९५३ | १९५४ |
| ( १ ) वसूल भांडवल | ३,०० | ३,०० | ४,५० | ४,५० | ४,५० |
| ( २ ) रिझर्व्ह व इतर फंड ( ३१-३-५५ ) | ३,३० | ३,७३ | ४,३९ | ५,०१ | ५,४९ |
| ( ३ ) ठेवी | ७६,६० | ७९,३९ | ८५,९३ | ८७,९३ | ९९,३० |
| ( ४ ) इन्व्हेस्टमेंटस | २८,८२ | २४,६४ | ३०,०८ | ३१,०५ | ३४,०० |
| ( ५ ) कॅश, बँकांत | १८,४९ | १८,२६ | २१,९० | १९,८८ | २०,२७ |
| ( ६ ) कर्जें | ४५,३४ | ४८,१८ | ४१,८० | ४७,८७ | ५७,७८ |
| ( ७ ) निव्वळ नफा | ०,७९ | १,१३ | १,१२ | १,१६ | १,२० |

### उत्तर-प्रदेशांत विजेचा अधिक पुरवठा

उत्तर-प्रदेश सरकारनें राज्यांतील विजेचा पुरवठा वाढविण्याच्या योजना हातीं घेतलेल्या आहेत. त्यांपैकीं एक योजना नैनिताल जवळील तराई प्रदेशांत अंगीकारण्यांत आली होती. पाण्यापासून वीज निर्माण करण्यासाठीं आंखण्यांत आलेली ही योजना पूर्ण होण्यास १० वर्षें लागतील. पण, योजनेंतील २५० टन वजनाचा एक मोठा टर्बाइन आतांच फिरूं लागला आहे. त्यामुळें दोन महिन्यांच्या आंत राज्यांतील विजेचा पुरवठा ३० टक्क्यांनीं वाढेल. संपूर्ण योजना पुरी करण्यासाठीं राज्य सरकारनें १६·३४ कोटी रुपयांची रक्कम खर्च करण्याचें ठरविलें आहे. उत्तर-प्रदेशाच्या मध्यावर असणाऱ्या ११ जिल्ह्यांना योजना पूर्ण झाल्यावर विजेचा पुरवठा होऊं लागेल. सध्या वीज उत्पन्न करणारा टर्बाइनसुद्धां आपल्या उत्पादनशक्तीपैकीं ½ शक्तीच वापरांत आणीत आहे. येत्या जूनपासून आणखी दोन टर्बाइन्स फिरूं लागतील व विजेचें उत्पादन ४०,००० किलोवॅट इतकें होईल. गंगा-ग्रिडच्या साह्यानें ७६,००० किलोवॅट वीज उत्पन्न होते हें लक्षांत घेतलें, म्हणजे ह्या योजनेचें महत्त्व समजून येतें. औंध, रोहिलखंड आणि कुमाऊन ह्या भागांतील १०१ गांवांना विजेचा पुरवठा करणें शक्य होईल, आणि ९३ लहान-मोठ्या शहरांना विजेचा प्रकाश पुरवितां येईल. राज्य सरकारकडे ३,००० किलोवॅट विजेच्या मागणीचे बरेच अर्ज आलेले आहेत. लवकरच विजेच्या पुरवठ्याचे दर ठरविण्यांत येतील आणि विजेचा पुरवठा होऊं लागेल. उत्तर-प्रदेशांतील २५० ट्यूबवेल्स-नाहि पाणी उपसण्यासाठीं विजेचा पुरवठा करण्यांत येईल. विजेचा पुरवठा निश्चित झाल्यामुळें सरकार व लोक येत्या सहा महिन्यांत आणखी २५० ट्यूबवेल्स खोदण्याचा विचार करीत आहेत.

---

## लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें

### संग्रहालयांत आलेले कांहीं ताजे ग्रंथ

( 1 ) **World Resources and Industries.** by Erich W. Zimmermann, Publishers Harper Brothers, New York. pp. 832. Price $ 7·50.

( 2 ) **Gazetter of Bombay State** (Revised Series) Vol. General. A. BOTANI, Part I = Medicinal Plants. Published by Govt. of Bombay pp. 279. Price Rs 6/7/-.

( ३ ) **बृहन्महाराष्ट्र अॅग्रिकल्चरल डिरेक्टरी, शेती-मार्गदर्शिका**, संपादक, व. स. काणे, श्री. य. फडके, शेती साहित्य संस्था, ९२८ सदाशिव पेठ, पुणें २, पृष्ठसंख्या-५९२, किंमत रु. १५.

( 4 ) **Field Crops of India.** by A. K. Yegna Narayan Aiyar, Publisher the Bangalore Printing & Publishing Co. Ltd., Bangalore pp. 618, Price Rs. 20/-

( 5 ) **Fruit Growing in India.** By W. B. Hayes, Publisher Kitabistan, Allahabad, pp. 449.

# अर्थ

बुधवार, ता. १३ एप्रिल, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## श्री. प्राणलाल दे. नानजी ह्यांचें भाषण

### बँकांनीं अंतर्गत ( गुप्त ) रिझर्व्ह वाढविण्याची आवश्यकता

इंडियन बँक्स असोसिएशनचे भूतपूर्व चेअरमन, श्री. प्राणलाल देवकरण नानजी, ह्यांनीं असोसिएशनच्या वार्षिक सभेंत भाषण करतांना हिंदी बँकिंगच्या सद्यःस्थितीबद्दल आपले विचार व्यक्त केले व ह्या व्यवसायाचा आढावा घेतला. त्यांच्या भाषणांतील महत्त्वाच्या मुद्यांचा परामर्ष येथें घेण्याचें योजिलें आहे.

### ठेवींत वाढ

१९४८ मध्यें शेड्यूल्ड बँकांकडे सुमारें ९३५ कोटी रुपयांच्या ठेवी होत्या. ह्या ठेवी घटत जाऊन १९५२ मध्यें ८५३ कोटी रुपयांवर आल्या. १९५४ अखेर त्याची रक्कम ९२६ कोटी रुपये झाली; म्हणजे एका वर्षाचे अवधींत ठेवींमध्यें ७३ कोटींची भर पडली. देशाच्या आर्थिक प्रगतीस बँकांनीं हातभार लावावयाचा, तर त्यांचेजवळील ठेवी ह्या एकसारख्या वाढत जाणें जरूरच आहे. त्याचप्रमाणें, नोकरवर्गाच्या पगाराचा बोजा ठेवी वाढल्याखेरीज पेलला जाणार नाहीं.

१९४८ अखेर भारतांत एकूण ५,२७७ बँक-कचेऱ्या होत्या. १९५२ अखेर त्यांची संख्या ४,८३९ झाली. १९५३ मध्यें ह्यांत थोडी सुधारणा होऊन त्यांची संख्या ४,८७९ पर्यंत गेली. १९५४ अखेरचे आंकडे अद्याप उपलब्ध नाहींत. तथापि, नव्या शाखा उघडण्याचा बँकांचा उत्साह आतां उरलेला नाहीं. औद्योगिक कोर्टाचे निवाडे बँकांना जाचक होत असून, शाखावाढीस त्यामुळें आडकाठी आली आहे.

### उत्पन्न वाढलें; खर्च त्याहूनहि वाढला

१९४८ मध्यें हिंदी शेडयूल्ड बँकांचें उत्पन्न २९·७३ कोटी रुपये होतें, तें १९५३ मध्यें ३४·३४ कोटी रुपये झालें. पण, खर्चांत त्याहीपेक्षा अधिक प्रमाणांत वाढ होऊन निव्वळ नफ्याची रक्कम ८·०७ कोटी रुपयांवरून ६·५१ कोटी रुपयांवर उतरली. ठेवींवर दिलेल्या व्याजाची रक्कम १९४८ मध्यें ७·५२ कोटी रुपये होती, ती १९५३ मध्यें ९·५१ कोटी रुपये झाली आणि नोकरवर्गाचा पगारहि १९४८ मधील ९·५० कोटी रुपयांचा १९५३ मध्यें १३·२६ कोटी रुपयांवर गेला. १९५२ मधील आकड्यांशीं तुलना केली, तर अमेरिकन बँकांचा नोकरावरील खर्च एकूण उत्पन्नाच्या २२·१% झाला; तेंच प्रमाण हिंदी शेडयूल्ड बँकांच्या बाबतींत ५०·८६% पडलें.

### काम अधिक करा

बँक ॲवार्डनें बँकनोकरांच्या कामाचे कमाल तास ६३ ठरविले आहेत. आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या देशांत, तरुण व उत्साही नोकरानें ६३ तास काम करणें पुरेसें आहे किंवा काय, आणि गुमास्ता कायद्यानें कमाल तास आठ ठरविले असतांना कांहीं नोकरांना ६३ तासांपेक्षां जास्त काम करावें लागूं नये हें इष्ट कीं अनिष्ट, ह्याचा विचार सोडून द्या. पण आपल्या देशासाठीं प्रत्येकानें कसून काम केलें पाहिजे; देशाचा उद्धार होईतो "आराम हराम है" असें मानलें पाहिजे, असें पं. नेहरू सांगत आहेत. बँक-नोकर कामाचे तास कमी आहेत हें लक्षांत घेऊन निष्ठापूर्वक काम करतील, तर कमी वेळाची कसर भरून येईल.

### अंतर्गत रिझर्व्हची आवश्यकता

बँकांच्या अंतर्गत गंगाजळीस कधींकधीं 'गुप्त रिझर्व्ह' असें म्हटलें जातें. त्यांतील 'गुप्त' ह्या शब्दामुळें कित्येकांची दिशाभूल होते. परंतु, ज्यावेळीं बँकेला शक्य आहे अशा वेळीं तिनें पुरेसे अंतर्गत रिझर्व्ह निर्माण केले नाहींत, तर ती गोष्ट बँकेच्या व जनतेच्या हितास धरून होणार नाहीं. कठीण प्रसंगीं उपयोगीं पडावेत, म्हणून प्रकट न केलेले ते रिझर्व्ह असतात; ह्यापेक्षा त्यांचें दुसरें कांहींहि वैशिष्ट्य नसतें. प्रकट केलेल्या रिझर्व्हमधून अडचण भागविण्यासाठी तरतद करावी लागली, तर ठेवीदारांचा व जनतेचा बँकेवरील विश्वास कमी होण्याचा संभव असतो. प्रत्येक बँकेनें सर्व संशयित व बुडीत येणीं दर वर्ष-अखेर लिहून टाकावींत आणि शिवाय त्यांसाठी मोठा अंतर्गत रिझर्व्हहि निर्माण करावा. कारण, दरसाल बुडीत येणीं लिहून टाकलीं तरी बाकीचीं सर्व येणीं वसूल होतीलच, असें नाहीं. तारणावरील कर्जे बुडीत होण्याचा संभव नाहीं, ही कल्पना चुकीची आहे. तारणावरील बुडीत कर्जांचें प्रमाण हातावरील कर्जें बुडीत होण्याच्या प्रमाणाइतकेंच असतें, असा बँकर्सचा अनुभव आहे. राजकीय स्थित्यंतरें, अफरातफर, बनावट कागदपत्रें, दस्तावेजमधील कायद्याच्या चुका, मालाच्या व रोख्यांच्या किंमतींत एकाएकी उतार आणि व्यक्तींची पत नष्ट होण्याचे प्रसंग, ह्या सर्व गोष्टींची शक्यता विसरून चालत नाहीं, व त्यामुळें येणाऱ्या नुकसानीची तरतूद करणें अगत्याचेंच ठरतें. वरील पैकीं कोणत्याहि कारणानें बँकेस नुकसान आलें, तर तें भरून काढण्यासाठी प्रकट रिझर्व्हचा अवलंब न करतां अंतर्गत रिझर्व्हचा उपयोग करण्याची जगांतील सर्वच बँकांची पद्धति आहे, व त्यासाठी बँका पुरेसे गुप्त रिझर्व्ह राखतात व वाढवितात. हिंदी बँकांनाहि असे रिझर्व्ह निर्माण करण्यास प्रोत्साहन दिलें पाहिजे व ते रिझर्व्ह भरपूर होईपर्यंत बँकांवरील नोकरवर्गाच्या पगाराचा बोजा वाढतां कामा नये.

### ठेवींवरील व्याजाचा वाढता बोजा

हिंदी बँकांच्या निव्वळ नफ्यावर परिणाम करणाऱ्या मुख्य गोष्टी म्हणजे त्यांना ठेवींवर द्यावें लागणारें भारी दरांचें व्याज आणि नोकरवर्गावर होणारा भारी खर्च, ह्या होत.

कॉलमनीवरील व्याज, ही तुलनात्मक दृष्ट्या सर्वांत खर्चाची बाब आहे. १९५४ मध्यें बराच काळ बँकांनीं २ ते २½% व्याज कॉलमनीवर दिलें. हा पैसा पूर्वी बँकांकडेच चालू खात्यावर ०½% व्याजानें किंवा बिनव्याजी पडून असे; त्याच पैशावर जवळ जवळ बँकरेटनें व्याज देणें, असा हा व्यवहार होतो. बँकांकडे त्यामुळें विशेष ज्यास्त पैसा आकृष्ट होतो, असेंहि नाहीं.

( पृष्ठ ११९ पाहा )

# BHOR STATE BANK LIMITED, BHOR.

*Balance Sheet as at 31st December, 1954.*

## CAPITAL AND LIABILITIES

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Capital** | | |
| **Authorised Capital** | | |
| 10,000 Shares of Rs. 50/- each ... | | 5,00,000—0—0 |
| **Issued Capital** | | |
| 10,000 Shares of Rs. 50/-each ... | | 5 00,000—0—0 |
| **Subscribed Capital** | | |
| 10,000 Shares of Rs. 50/- each ... | | 5,00,000—0—0 |
| Amount called up at Rs. 25/-each ... | | 2,50,000—0—0 |
| **2. Reserve Fund And Other Reserves** | | |
| Reserve Fund ... | 42,207—2—0 | |
| Investment Reserve Fund ... | 24,130—6—0 | |
| Investment Fluctuation Fund ... | 3,534—8—0 | 69,872—0—0 |
| **3. Deposits And Other Accounts** | | |
| Fixed Deposits ... | 3,32,233—5—6 | |
| Savings Bank Deposits ... | 5,49,207—7—1 | |
| Current Accounts, Contingency Accounts, etc. ... | 3,29,136—5—11 | 12,10,577—2—6 |
| **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, Etc.** | | |
| (i) In India ... | 1,45,798-12-10 | |
| (ii) Outside India ... | Nil | 1,45,798-12-10 |
| **Particulars:** | | |
| (i) Secured against Government Securities shown as per contra | 1,45,798-12-10 | |
| (ii) Unsecured ... | Nil | |
| **5. Bills Payable:** ... | Nil | Nil |
| **6. Bills For Collection, being Bills Receivable as per Contra** | | |
| (i) Payable in India ... | 6,486-13—3 | |
| (ii) Payable outside India ... | Nil | 6,486-13—3 |
| **7. Other Liabilities:** | | |
| (i) For Expenses ... | 401—0—0 | |
| (ii) Provident Fund partly invested as per contra ... | 9,946—6—4 | |
| (iii) Unpaid Dividends ... | 3,213-12—8 | |
| (iv) Branch Adjustments ... | 5,939-11—5 | 19,500-14—5 |
| **8. Acceptances, Endorsements and Other Obligations as per Contra** | Nil | Nil |
| **9. Profit and Loss** | | |
| Profit as per last Balance Sheet ... | 603-11—6 | |
| Less: appropriations :— | | |
| Reserve Fund Rs. 500—0—0 | | |
| Dividend Rs. Nil | 500—0—0 | |
| | 103-11—6 | |
| Add: Net profit for the year (subject to taxation) brought from the Profit and Loss Account. ... | 9,797—7—3 | 9,901—2—9 |
| **10. Contingent Liabilities** | Nil | Nil |
| Total Rs. ... | | 17,12,136-13—9 |

# BHOR STATE BANK LIMITED, BHOR.

***Balance Sheet as at 31st December 1954***

## PROPERTY AND ASSETS

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Cash** | | |
| In hand and with Reserve Bank and Imperial Bank (including foreign currency notes) ... | | 1,73,631—5—5 |
| **2. Balances with Other Banks** (In current account) | | |
| (i) In India ... | 9,552—0—4 | |
| (ii) Outside India ... | Nil | 9,552—0—4 |
| **3. Money At Call And Short Notice** ... | | Nil |
| **4. Investments at Cost** (Face value Rs. 8,63,300) | | |
| (i) Securities of the Central and State Governments and other Trustee securities including Treasury Bills of the Central and State Governments. ... | 8,65,645—0—0 | |
| (Of these, securities of the face value of Rs. 7,700/- are earmarked for Provident Fund as per contra. Market Value Rs. 8,07,187-8-0. Some of these Securities of the face value of Rs. 6,50,000/- are lodged with Banking Companies for overdraft arrangement) | | |
| (ii) Shares. Ordinary Shares fully paid of the face value of Rs. 600/- (Market Price Rs. 645/-) | 645—0—0 | |
| (iii) Debentures or Bonds. ... | Nil | |
| (iv) Other Investments. ... | Nil | |
| (v) Gold. ... | Nil | 8,66,290—0—0 |
| **5. Advances** (Other than Bad and Doubtful Debts for which Provision has been made to the satisfaction of the Auditors). | | |
| (i) Loans, Cash-Credits, Over-drafts, etc. | | |
| (i) In India | 6,06,891-11—0 | |
| (ii) Outside India | Nil | |
| | 6,06,891-11—0 | |
| (ii) Bills Discounted and Purchased (excluding Treasury Bills of the Central & State Governments). | | |
| (i) Payable in India | 6,000—0—0 | |
| (ii) Payable outside India. | Nil | 6,12,891-11—0 |
| Particulars Of Advances (*See Page 118*) | | |
| **6. Bills Receivable, Being Bills for Collection as per Contra** | | |
| (i) Payable in India ... | 6,486-13—3 | |
| (ii) Payable outside India ... | Nil | 6,486-13—3 |
| **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and Other Obligations, Per Contra** ... | Nil | Nil |
| **8. Premises Less Depreciation** ... | Nil | Nil |
| **9. Furniture and Fixtures, at Cost** ... | 23,222—2—9 | |
| Additions ... | 137—6—6 | |
| | 23,359—9—3 | |
| Less Depreciation ... | 12,452—2—0 | 10,907—7—3 |
| **10. Other Assets, Including Silver** | | |
| (i) Interest on Investments accruing but not due and interest outstanding ... | 6,318—0—0 | |
| (ii) Income Tax paid at source ... | 14,609—9—0 | |
| (iii) Sundry Debtors (Rs. 863-4-9) being considered doubtful and not Provided for ... | 8,254—3—9 | 29,181-12—9 |
| **11. Non Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** (Agricultural land: Rs. 1700/- received as earnest money against sale) ... | | 3,195-11—9 |
| **12. Profit and Loss Account** ... | | Nil |
| Total Rs. ... | | 17,12,136-13—9 |

# BHOR STATE BANK LIMITED, BHOR.

**Particulars of Advances Referred to on the assets side of the Balance Sheet on page 117**

| Particulars of Advances :— | Rs. As. Ps. |
|---|---|
| (i) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured | 3,68,915–11–1 |
| (ii) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security. ... | 1,98,549—3–11 |
| (iii) Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties, in addition to the personal security of the debtors. ... | Nil |
| (iv) Debts considered doubtful or bad, not provided for. ... | 45,426–12—0 |
| | 6,12,891–11—0 |
| (v) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other person. ... | Nil |
| (vi) Debts due by companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents, or in the case of private companies as members. ... | 9,477—1—0 |
| (vii) Maximum total amount of advances, including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons. ... | Nil |
| (viii) Maximum total amount of advances, including temporary advances granted during the year to the companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents or in the case of private companies, as members. ... | 9,997–11–6 |
| (ix) Due from Banking Companies. ... | Nil |

***Profit and Loss Account for the Year ended 31st December, 1954***

| EXPENDITURE | Rs. As. Ps. | | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| 1. Interest paid on deposits, borrowings, etc. ... | 27,097—1—9 | INCOME : (Less provision made during the year for bad and doubtful debts & other usual or necessary provisions). | |
| 2. Salaries and allowances and Provident Fund. ... Manager & Chief Executive Officer. 4,960—0—0; Others 19,651—3—2 | 24,611—3—2 | 1. Interest and discount. ... | 69,940—0—1 |
| | | 2. Commission, exchange, brokerage. | 1,411–10—3 |
| | | 3. Rents. | Nil |
| 3. Directors' & Local Committee Members' fees and allowances. ... | 3,018—0—0 | 4. Net profit on sale of investments, gold and silver, land premises, and other assets, (not credited to reserves or any particular fund or account) | Nil |
| 4. Rent, taxes, insurance, lighting, etc. ... | 3,670–15—6 | | |
| 5. Law charges. ... | 45—0—0 | 5. Net profit on revaluation of investments, gold and silver, land, premises and other assets (not credited to reserves or any particular fund or account.) ... | Nil |
| 6. Postage, telegrams & stamps ... | 933—1—0 | | |
| 7. Auditors' fees. ... | 350—0—0 | | |
| 8. Depreciation on and repairs to the Banking Company's property | 1,175—7—0 | | |
| 9. Stationery, printing, advertisement, etc. ... | 935—4–11 | 6. Income from non-banking assets and profit from sale of or dealing with such assets. ... | Nil |
| 10. Loss from sale or dealing with non-banking assets. ... | Nil | 7. Other receipts : | |
| 11. Other expenditure : Sundry charges 816–2–0; Travelling & conveyance 1,612–15–0 | 2,429—1—0 | Share Transfer fees and splitting charges. 10—2—0; Safe Custody Charges. 306—8—0; Supervision Charges. 1,988–14—0; Sundry Receipts. 405—7—3 | 2,710–15—3 |
| 12. Balance of profit (Subject to taxation) carried to Balance Sheet | 9,797—7—3 | | |
| Total Rs. ... | 74,062—9—7 | Total Rs. ... | 74,062—9—7 |

**N. V. Pandav**
*Manager*

**Y. S. Joshi**
*Asstt. Manager*

**M. V. Shingre**
*Chairman*

Poona,
3rd Feb. 1955.

**N. P. Thopte**, *Vice Chairman*
**Y. D. Khole**
**B. G. Dhanduke**
**C. R. Rathi**
} *Directors*

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHARE-HOLDERS

We have audited the above Balance Sheet of Bhor State Bank Ltd., Bhor, as at 31st December, 1954, and also the above Profit and Loss Account of the Bank for the year ended upon that date, in which are incorporated the certified returns of her Branches and report that :—

(*a*) We have obtained all the information and explanations we have required; (*b*) In our opinion, the above Balance Sheet and Profit and Loss Account are drawn up in conformity with the Law; (*c*) Such Balance Sheet exhibits a true and correct view of the state of the Bank's affairs according to the best of our information and the explanations given to us and as shown by the books of the Bank; and (*d*) In our opinion, books of account have been kept by the Bank as required by Section 130 of the Indian Companies Act.

We have to report further that: (*e*) The information and explanations required by us have been found to be satisfactory; (*f*) The transactions of the Bank which have come to our notice, in our opinion, have been within the powers of the Bank, (*g*) The returns received from the Branch Offices of the Bank have been found adequate for the purpose of this audit, (*h*) The Profit and Loss Account, in our opinion, shows a true balance of profit for the period covered by such account.

Poona,
3rd Feb. 1955.

**GADRE and BHIDE,**
*Chartered Accountants.*

( पृ. ११५ वरून पुढें चालू )

ठेवींवरील व्याजाचा बोजा उतरविण्यासाठी बँकांनीं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर बी. रामराव, ह्यांच्या पुढाकारानें गेल्या वर्षी बरेच प्रयत्न केले. परंतु सहकार्याचे हे प्रयत्न यशस्वी झाले नाहींत व सर्व बँकांना मान्य होईल अशी एकवाक्यता घडून येऊं शकली नाहीं. त्यामुळें, डिमांड ठेवींवरील भारी व्याजाचा बोजा कमी होत नाहीं. ह्या बाबतींत पुनः प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

### कर्जावरील व्याजाचे दर वाढविण्याची शक्यता

खर्चात झालेली वाढ भरून काढण्यासाठी बँकांनीं त्यांच्या कर्जावर शक्य तेथें ज्यास्त व्याज आकारणें सयुक्तिक होईल. सरकारी कर्जावरील व्याजाचा दर २½% चा ४% झाला आहे, पण त्यामानानें बँकांच्या कर्जाचे दर वाढलेले नाहींत. देशाच्या आर्थिक प्रगतीस हातभार लावण्याचा उद्देश त्यानें साध्य होत असला, तरी खर्चाच्या वाढीचा कांहीं बोजा ठेवीदार, कर्जदार वर जनता ह्यांचेवर टाकण्याची आर्ता वेळ आलेली आहे. कर्जावर अधिक दरानें व्याज आकारणें अर्थात सोपें नाहीं; कारण वाढत्या दरानें कर्ज घेणें कर्जदारांनाहि परवडलें पाहिजे.

### सर्व्हिस चार्जेसची आवश्यकता

बँका त्यांच्या गिऱ्हाइकांचीं जीं कामें आज करतात, त्यासाठी त्या पुरेसा चार्ज लावीत नाहींत, असेंच बहुधा आढळतें. गिऱ्हाइकाकडून प्रत्येक वेळीं असा चार्ज घेणें बँकरला मनापासून पसंत पडत नाहीं, पण त्या कामासाठी येणारा खर्च त्यानें भरून काढायला कांहींच हरकत नाहीं आणि आतां तें जरूरीचेंहि झालें आहे. हीं किरकोळ कामें करण्याचें बंद करण्यापेक्षा, चार्ज घेऊन तीं चालू ठेवणें हेंच श्रेयस्कर होय. चेक बुकें, पे-इन-स्लिप बुकें, पास बुकें, इत्यादींसाठी बँकांनीं पैसे वसूल करावे; आणि ज्या खात्यांत पुरेशी रक्कम शिल्लक नसते, त्यांचेवर पुरेसा सर्व्हिसचार्ज बसवावा. अमेरिकेंत सर्व्हिस चार्जेस ही नित्याची बाब आहे. भारतांत बँकिंगचा प्रसार व्हावयाची अपार आवश्यकता असतांना, असे चार्जेस करण्यास हिंदी बँका साहजिकच उत्सुक नसतात.

### उत्पन्न वाढविण्यासाठी रिझर्व्ह बँकेची मदत हवी

बँकांनीं आपला स्टॅट्युटरी रिझर्व्ह, रिझर्व्ह बँकेमध्यें रोखी-ऐवजीं सरकारी रोख्यांत ठेवण्याची सवलत बँकांना देतां येण्याजोगी आहे. त्यामुळें, बँकांच्या उत्पन्नांत भर पडेल. त्यांचें उत्पन्न वाढल्याखेरीज बँकांना देशाच्या आर्थिक विकासास प्रभावी हातभार लावतां येणार नाहीं; म्हणून रिझर्व्ह बँकेला ही सूचना करण्यांत येत आहे.

---

**जपानशीं हवाई वहातुकीचा करार**—भारत व जपान ह्या देशांत हवाई वहातूक चालू करण्याच्या वाटाघाटी सध्यां चालू असून त्या लवकरच फलद्रूप होतील. जपानप्रमाणेंच इराण व चीन ह्या देशांबरोबरहि हवाईवहातुकीचे करार करण्यासंबंधीं बोलणीं चालू आहेत.

**मुंबई येथें स्टील फौंड्री**—मुंबई येथील नेव्हल डॉकयार्ड-मध्यें एक स्टील फौंड्री स्थापन करण्याचा भारतीय सरकारचा इरादा आहे अशी माहिती राज्यसभेंत सांगण्यांत आली. फौंड्रीसाठी लागणारी यंत्रसामुग्री सुमारें साडे-पांच लाख रुपये किंमतीची असून तीसाठी मागणी नोंदविण्यांत आली आहे.

### भारतामधील सहकारी चळवळीचा आढावा

भारतामधील १९५२–५३ सालांतील सहकारी चळवळीचा आढावा घेणारी आंकड्यांचीं कोष्टकें रिझर्व्ह बँकेच्या अग्रिकल्चरल क्रेडिट खात्यातर्फे प्रसिद्ध करण्यांत आलीं आहेत. ह्या कोष्टकांवरून भारताच्या सर्व राज्यांतील सहकारी चळवळीचें संपूर्ण चित्र डोळ्यांसमोर उभें रहाण्यासारखें आहे. १९५२–५३ सालअखेर भारतांतील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांची संख्या १,८९,४३६ इतकी होती. त्या सर्वांच्या सभासदांची संख्या १·४४ कोटी होती, आणि सर्व संस्थांचें मिळून खेळतें भांडवल ३२७·१० कोटी रुपये होतें. त्यापूर्वीच्या वर्षाचे हेच आंकडे अनुक्रमें १,८५,६५०, १·३ कोटी आणि ३०६·३४ कोटी असे आहेत. भारतामधील कुटुंबांत सरासरी ५ माणसें असतात असें धरलें तर ७·१६ कोटी लोक अगर एकूण लोकसंख्येच्या १९·२ टक्के इतकी लोकसंख्या सहकारी चळवळीच्या कक्षेंत आलेली आहे. १९५१–५२ सालीं १८·८ टक्के लोकसंख्या सहकारी चळवळीच्या कक्षेंत आलेली होती. १९५२–५३ सालीं सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँकांची संख्या चारांनीं कमी झाली. १९५१–५२ सालीं अशा बँकांची संख्या ५०९ होती. ती १९५२–५३ साली ५०५ झाली. तथापि त्यांच्या सभासदांच्या संख्येंत मात्र वाढ झाली. सभासदांची संख्या २,३१,३१६ होती, ती ५२–५३ साली २,४८,६५० झाली. अग्रिकल्चरल क्रेडिट सोसायटीज ह्या सहकारी चळवळीचा पायाच होत. १९५१–५२ सालीं अशा संस्थांची संख्या १,०७,९२५ होती. ती १९५२–५३ सालीं १,११,६२८ झाली. ह्या संस्थांच्या सभासदांची संख्या ५१·२६ लाख होती आणि त्यांचें खेळतें भांडवल ४९·१८ कोटी रुपये होतें. बिगर–शेतीच्या पतीच्या सहकारी संस्थांच्या संख्येंत, सभासदांत आणि उलाढालींतहि १९५२–५३ सालीं वाढ झालेली दिसून येते.

---

### अधिक तांत्रिक मदत देण्याची मागणी

आशिआ आणि अतिपूर्वेकडील देश ह्यांना आर्थिक साहाय्य करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेनें एक उपसंघटना स्थापन केलेली आहे. ह्या उपसंघटनेची परिषद् टोकिओ येथें भरविण्यांत आली होती. परिषदेला भारतानेंहि आपलें प्रतिनिधीमंडळ पाठविलें होतें. प्रतिनिधीमंडळाचे नेते श्री. बी. आर. भगत परिषदेंत बोलतांना म्हणाले कीं, आशिआंतील देशांना भांडवलाचा तुटवडा आहे ही गोष्ट तर खरीच आहे. पण ह्याहीपेक्षा तांत्रिक ज्ञानाचा अभाव ही गोष्ट त्यांच्या आर्थिक विकासाच्या कामांत मोठी अडचण होऊं शकेल. संयुक्त राष्ट्रसंघटनेतर्फे देण्यांत येणाऱ्या तांत्रिक मदतीसंबंधींच्या अहवालावर परिषदेंत चर्चा करण्यांत आली. अहवालांत असें म्हटलें आहे कीं तांत्रिक साह्याच्या प्रमाणाविषयींच विचार केला तर तें प्रमाण अत्यंत थोडें आहे. श्री. भगत ह्यांनीं कोलंबो योजनेप्रमाणें भारताला जें तांत्रिक साह्य देण्यांत आलें त्याबद्दल आणि अमेरिकेनें केलेल्या साह्याबद्दल आभार मानले. ते पुढें म्हणाले, कीं संयुक्त राष्ट्र-संघटनेमार्फत अविकसित देशांना जें तांत्रिक साह्य देण्यांत येतें त्यांत वाढ करण्यांत आली पाहिजे. चालू सालांत रशिआंतील कांहीं भूस्तरशास्त्रज्ञ भारतांत येऊन भारताच्या खनिज संपत्तीचा शोध करणार आहेत. भारत ह्या तज्ज्ञांच्या भेटीची वाट पहात आहे. रशिआचे भारतामधील वकील मि. मोन्शिकॉव्ह हेहि परिषदेला हजर राहिले होते. ते आपल्या भाषणांत म्हणाले, कीं ज्या देशांकडून तांत्रिक साह्य पुरविण्यांत येतें त्या देशानें साह्याच्या मोबदला म्हणून कोणत्याहि प्रकारच्या राजकीय, आर्थिक अगर लष्करी मागण्या करतां कामा नयेत.

**रशिआजवळ रॉकेट्स अस्त्रें**—रशिआनें दूर अंतरावर टाकतां येण्यासारखे रॉकेट्स बाण तयार करण्यांत यश मिळविलें आहे, अशी वार्ता आहे. हीं रॉकेट्स् एका खंडांतून दुसऱ्या खंडांत उड्डाण करूं शकतील इतकीं जोरकस आहेत. त्यांचा पल्ला ५,००० मैलांचा असून तीं ताशीं १०,००० मैल वेगानें जाऊन आपल्या लक्ष्यावर आदळतील. ह्या भयंकर अस्त्रांची अमेरिकेला माहिती झाल्यामुळेंच अमेरिकन सरकारनें आपल्या अंदाजपत्रकांत विमानदलावरील खर्चांत बरीच वाढ केली आहे.

**विंध्य प्रदेशांत युरेनिअमची माती**—भारतयि सरकारचे भूस्तरशास्त्रज्ञ विंध्यप्रदेशाची खनिजविषयक पहाणी करीत आहेत. ही पहाणी करीत असतांना त्यांना कांहीं भागांत युरेनिअम व मोनाझाइट असणारी माती सांपडली आहे. राज्याच्या पहाणीचें काम अद्याप बऱ्याच अंशानें पूर्ण व्हावयाचें आहे.

**चीन भारतीय बोलपट दाखविणार**—चीनच्या बोलपट धंद्यांतील कलावंतांचा मुंबई येथें सत्कार करण्यांत आला. त्याप्रसंगीं चिनी कलावतांच्या नेत्यानें असें सांगितलें कीं, चीन-मध्यें भारतीय बोलपट दाखविण्याची व्यवस्था लवकरच करण्यांत येत आहे. भारतीय बोलपटांचें चीनमध्यें चांगलें स्वागत होईल अशी खात्री त्यांनीं व्यक्त केली.

**निर्वासितांना काम देण्यासाठीं**—मुंबईच्या उत्तरेला असलेल्या उल्हासनगर ह्या ठिकाणीं भारतीय सरकारनें मध्यम प्रतीचे तीन कारखाने काढण्याचें ठरविलें आहे. निर्वासितांना काम देण्यासाठी हे कारखाने काढण्यांत येत आहेत. यंत्रें तयार करण्याचा कारखाना, रेडिओचे भाग तयार करण्याचा कारखाना आणि एक तेलाची गिरणी, असे उद्योगधंदे काढण्यांत येणार आहेत.


**तेनसिंगचें आत्मचरित्र**—गौरीशंकर शिखरावर आरोहण करणारे गिर्यारोहक श्री. तेनसिंग ह्यांचें आत्मचरित्र लंडन येथें येत्या मे महिन्यांत प्रसिद्ध होणार आहे. तेनसिंग ह्यांनीं आपलें आत्मवृत्त जेम्स उलमन ह्या प्रसिद्ध अमेरिकन ग्रंथकाराला सांगितलें व त्यांनीं तें लिहून घेतलें. पुस्तकाचें नांव 'मॅन ऑफ एव्हरेस्ट' असें ठेवण्यांत येईल.

**सोन्याच्या दागिन्यावरील विक्रीकर**—सोन्याच्या व चांदीच्या दागिन्यांवरील विक्रीकराची माफी देण्याचें राजस्थान सरकारनें ठरविलें आहे. मात्र माफी मिळविणाऱ्यानें माफीसंबंधीचें योग्य ते सर्टिफिकेट दाखल केलें पाहिजे. अशा प्रकारचें सर्टिफिकेट मिळविण्यासाठीं सालीना १० रुपयांची फी ठेवण्यांत आली आहे.




किर्लोस्कर

हात पंप | सेंट्रिफ्युगल पंप



उन्हाळी पिकासाठी व
घरगुती पाणीपुरवठ्यासाठी
खात्रीची उपाययोजना

—अधिक माहिती मागवा—

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी.

कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

पृ. सं. १९८ ] दुसरी आवृत्ति [ किं. २॥ रु.

र. पु. परांजपे, ना. सी. फडके, शं. वा. किर्लोस्कर, चिं. वि. जोशी, वि. द. घाटे, इरावती कर्वे, इंदिराबाई देवधर, केसरी, सकाळ, लोकसत्ता, महाराष्ट्र, किर्लोस्कर, इत्यादींचे उत्कृष्ट अभिप्राय.

डेक्कन व्हर्नॅक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणें, कडून पुरस्कार.

सर्वत्र मिळतें. स्वतः वाचा, संग्रहीं ठेवा, आणि भेटीदाखल द्या.

पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.　१९५ भवानी पेठ, पुणें २.

खालील मालाचा घाऊक व किरकोळीनें व्यवहार केला जातो.

* शेतीचीं अवजारें, एंजिन्स व त्यांना लागणारीं तेलें.
* शेतीकरतां व जनावरांकरतां लागणारी पेंड, मिश्रखतें, अ. सल्फेट, पूर्णिमा मिश्रखत, वगैरे सर्व प्रकारचीं खतें.
* सिमला येथील शुद्ध बटाटा बियाणें व त्याकरतां लागणारें मिश्रखत.
* बटाटा, कांदा, लसूण, वगैरे शेतमालाचा अल्प कमिशनवर खरेदी–विक्री व्यवहार.
* गूळ, ज्वारी, बाजरी, तूर, वगैरे शेतमालाची खरेदी–विक्री.
* वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक सहकारी शालोपयोगी वह्या व उत्तरपत्रिका यांचा माफक दरानें पुरवठा.

फोन नं. ३२१५
तार–SANCOSOP

वरीलकरतां समक्ष भेटा अगर लिहा.

ना. द. कुलकर्णी
मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.